# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०८/२०१७/०५०००

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : २३.१०.२०१७ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : १३.११.२०१७ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : २२.११.२०१७ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : १९.१२.२०१७ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०८/२०१७**

**अपीलकर्ता :** श्री. जगनसिंह राजपूत,

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक २३/१०/२०१७ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत अर्ज केला. प्रतिवादी पत्र दिनांक १३/११/२०१७ ला अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक २२/११/२०१७ ला वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २४/११/२०१७ ला नोटिस पाठवून अपिल सुनावनीची संधी दिली व दिनांक ११/१२/२०१७ ला अपिलार्थी व प्रतिवादी यांना आपले समक्ष बाजू मांडण्याची संधी दिली. अपिलार्थी यांनी उपस्थित राहून आपले मौखिक म्हणणे अपिलीय अधिकारी यांचे समक्ष सादर केले. प्रतिवादी हे रजेवर असल्याने त्यांनी दिनांक ८/१२/२०१७ रोजी आपले लेखी निवेदन सादर केले होते.

३) माहिती अर्ज लक्षपूर्वक गृहित धरुन व त्याला प्रतिवादी यांचे आदेय/उत्तर व या अपिलातील मुद्यांना धरुन नास्तितील पुराव्याच्या आधारे अपिल निकाली काढण्यात येत आहे.-

**मागितलेली माहिती:-**

१. आपल्या राज्यामध्ये विज वितरण कंपनी महाराष्ट्र ला विज युनिट दर 10.62 पैसे असताना 11.15 पैसे घेण्याचा अधिकार असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.

२. ग्राहक क्र. 021519021550 या ग्राहकाचा युनिट रेट विज नियामक आयोग महाराष्ट्र प्रमाणे 10.62 पैसे असतांना 11.15 पैसे 2008 पासून घेण्यात आला असता विज वितरन कंपनी ची चुक असतांना जास्त घेतलेले पैसे बॅक व्याज दराने स्वत:हुन परत करण्याची तरतुद ग्राहक न्यायदृष्टीने असल्यास त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.

३. सदर विज वितरन कंपनी महाराष्ट्र ने विज युनिट दर 2008 पासून 10.62 पैसे असतांना 11.15 घेणे हा ग्राहक संरक्षण कायद्या अंतर्गत धोकाधाडीचा गुन्हा असतांना विज वितरन कंपनी महाराष्ट्र वर आयपीसी धारा 420 चा गुन्हा दाखल करण्याची तरतुद असल्याची किंवा ग्राहकास बॅक व्याजदराने 2008 पासून जास्त घेतलेले पैसे परत करण्याची तरतुद या दोन्ही बाबी असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी

४. आमच्या राज्यामध्ये युनिट रेट मध्ये विज वितरन कंपनीचे अधिकारी व कर्मचारी युनिट रेट 10.62 असतांना 11.15 पैसे अधिकाऱ्याच्या चुकीमुळे किंवा जानुनबुजून वसुलण्यात आले असता विज नियामक आयोग हे विज कंपनीवर सर्वोच्च न्यायालयाचा दर्जा असतांना विज वितरन कंपनी धोकाधडी करुन युनिट रेटचे पैसे वसुलत आहे म्हणून आपल्या आयोगाने त्यावर काय दंडात्मक कारवाईची उपाययोजना केली त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

**अपीलकर्ता याच्या मुददा क्र. १ ला उत्तर:** All the Tariff Orders issued by the Commission relating to MSEDCL's Tariff are available on MERC's website in downloadable format.

**अपीलकर्ता याच्या मुददा क्र. २ व ३ ला उत्तर:** Section 62 (6) of the Electricity Act, 2003 reproduced below stipulates that any excess recovery of charges needs to be refunded with interest equivalent to Bank Rate:

" *(6) If any licensee or a generating company recovers a price or charge exceeding the tariff determined under this section, the excess amount shall be recoverable by the person who have paid such price or charge along with interest equivalent to the bank rate without prejudice to any other liability incurred by the licensee.*"

**अपीलकर्ता याच्या मुददा क्र. ४ ला उत्तर:** For resolving billing dispute and other consumer specific grievances, the Commission through it's Consumer Grievance Redresses Forum and Electricity Ombudsman Regulation, 2006 has setup consumer grievance redresses mechanism. The Said Regulation is available on MERC's website in free downloadable format, which is available in downloadable format on Commission's websites www.merc.gov.in and www.mercindia.org.in

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

दिनांक २३/१०/२०१७ रोजी माहिती अधिकाराचे फार्ममध्ये नमुद केलेली माहिती अर्धवट दिली असून पूर्ण माहिती देण्यात आलेली नाही.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

अपीलातील दस्ताऐवजावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत अपिलात ,अपीलार्थी यांना प्रतिवादी यांनी मुद्या क्र १ शी संबंधीत दस्ताऐवज न दिल्याचे दिसून येते व ते आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध असल्याचे म्हटले आहे. प्रतिवादी यांना मुद्या क्र १ व २ च्या संबंधाने माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता फी करिता कुठलीही मागणी अथवा पत्र व्यवहार केल्याचे दिसून येत नाही. जरी कार्यालयीन वेबसाईटवर माहिती उपलब्ध असली तरी, माहिती अधिकारांत ती मागणी केली असल्यास, ती उपलब्ध करुन देण्यात यावी असे माहिती अधिकार कायद्यात म्हटले आहे. करिता प्रतिवादी यांनी अपिलार्थी यांना या संबंधाने उपलब्ध असलेले दस्ताऐवज निशुल्क उपलब्ध करुन द्यावे.

अपीलार्थी यांना मुद्या क्र. २ करिता अर्जात उल्लेख केलेला उतारा (extract) ची प्रत निशुल्क देण्यात यावी.

अपीलार्थी यांनी त्यांचा मुद्या क्र. ३ व ४ यामध्ये त्यांच्या अर्जात व अपीलात कोणतेही दस्तऐवज अथवा माहिती मागितली नसून, तक्रार स्वरुपात वितरण कंपनीच्या संबंधात गाऱ्हाणे मांडले आहे. करिता अपिलार्थी यांचे क्र. ३ व ४ हे मुद्दे माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार नसून, ते कायदेविसंगत असल्याने त्यावर निर्णय देता येत नाही.

जर अपिलार्थी यांना वितरण कंपनीच्या संबंधाने ग्राऱ्हाणे असल्यास, त्यांनी योग्य त्या कायदेशीर मार्गाने योग्य त्या तक्रार निवारण मंच / कोर्ट / प्राधिकरणात दाद मागावी.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

## निर्णय

१) अपिलार्थी यांची अपिल अशत: मजूर करण्यात येते.

२) अपिलार्थी यांना मुद्या क्र. १ व २ च्या संबंधाने कार्यलयात उपलब्ध असलेली माहिती या निर्णयानंतर १५ दिवसात विनाशुल्क उपलब्ध करून द्यावी.

३) मुद्या क्र. ३ व ४ गा-हाणे च्या स्वरुपात असल्याने त्यावर निर्णय देण्यात येत नाही.

करिता वरील अपील खालील निर्णयान्वये निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रुम नंबर ४,
उल्हासनगर- १, जि - ठाणे.

प्रतीलिपी- जनमाहिती अधिकारी, मविनिआ यांना निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता रवाना

**(अनिलकुमार उके)**
**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**